**विशेष दिवाणी दावा क्र. ३५३/२०२३ मधील निशाणी क्र. ४८ वरील आदेश**

(काशिनाथ दगडु साबळे वि. बाळु रोकडे व इतर)

(सीएनआर नं. एमएचएनएस२९००१९५५—२०२३)

अर्जदार यांनी सदरचा अर्ज वादी करीता दावा अवसायन पावल्याचा आदेश रदद् होणेकरीता दाखल केला आहे.

**०२.** अर्ज व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीचे विव्दान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०३.** वादीचा मुत्यु दिनांक ०६.०९.२०२० रोजी झाला आहे. कायदेशीर तरतुदींप्रमाणे सदर वादीचे कायदेशिर प्रतिनिधी दिनांक ०६.१२.२०२० रोजी किंवा त्यापूर्वी अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, तसे न केल्यामुळे वादी करीताचा दावा अवसायन पावला आहे. कायदेशिर तरतदींप्रमाणे दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होणेकरीता प्रस्तुत अर्ज दि.०६.०२.२०२१ किंवा त्यापुर्वी दाखल करणे आवश्यक आहे. परंतु वादीने प्रस्तुत अर्ज दि. २१/०२/२०२६ रोजी दाखल केला आहे. नि. ५० वरील आदेशाप्रमाणे प्रस्तुत अर्ज दाखल करणेस झालेला विलंब खर्चासह माफ करण्यात आला आहे. प्रस्तुत दावा नाशिक येथील वरीष्ठ स्तर न्यायालयातुन इगतपुरी येथील न्यायालयात सन २०२३ मध्ये वर्ग झाला. दावा वर्ग नोटीसा मिळाल्यानंतर वादीच्या कायदेशिर प्रतिनिधींना प्रस्तुत दाव्याबाबत माहिती झाली. त्यामूळे दाव्याचे स्वरुप पाहता वादीच्या पश्चात त्याच्या कायदेशिर प्रतिनिधींना प्रस्तुत दावा चालविण्याचे अधिकार प्राप्त होतात. प्रस्तुत अर्ज मुदतीत दाखल करण्याचे वादीने नमूद केलेले कारण योग्य व संयुक्तिक असलयामूळे वादी करीताचा दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द करणे न्यायाचे दृष्टिने आवश्यक व गरजेचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी करीताचा दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द करण्यात येतो.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

NANAWARE MOHINI DATTATRAY
Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2026.07.17 15:50:54 +0530

स्थळ:— इगतपुरी

दिनांक:— १७/०७/२०२६

( मो. द. ननवरे )

दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, इगतपुरी.